रयत शिक्षण संस्थेचे,

# श्री छत्रपती शाहू ज्यूनिअर कॉलेज एज्युकेशन, रुकडी

ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

## शाखा - अहवाल

**स्थापना :-**

आधुनिक महाराष्ट्राच्या शिक्षणाचे शिल्पकार व रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक, पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी प्राथमिक शिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी तसेच प्रशिक्षित शिक्षक बनविण्यासाठी १९५२ साली राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या नावे हे अध्यापक विद्यालय स्थापन केले.

**पार्श्वभूमी :-**

पंचगंगेच्या किनारी बसलेल्या निसर्गरम्य परिसर लाभलेल्या रुकडी गावात हे कॉलेज कार्यरत आहे. कॉलेजच्या प्रांगणात शाहू महाराजांचा भव्य पुतळा आहे. त्यामुळे कॉलेजच्या भव्यतेत भर पडली आहे.

दि. ०१ जुलै, २०१० पासून या विद्यालयास श्री. कांबळे बी. एम्. सर प्राचार्य म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या सखोल मार्गदर्शनाखाली विद्यालयाचा सर्व क्षेत्रांत शैक्षणिक व भौतिक मार्गदर्शनाखाली विद्यालयाचा सर्व क्षेत्रांत शैक्षणिक व भौतिक विकास होत आहे. या अध्यापक विद्यालयातून प्राचार्यांचा सिंहाचा वाटा आहे. या अध्यापक विद्यालयातून आज अखेर औपचारिक व अनौपचारिक असे सुमारे ३०,००० छात्राध्यापक व सेवांतर्गत अध्यापक प्रशिक्षण घेऊन प्राथमिक शिक्षक म्हणून महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रात स्वत:च्या वैशिष्टयपूर्ण आगळावेगळा ठसा उमटविता आहेत.

**सेवकवृंद :-**

या अध्यापक विद्यालयात प्राचार्यासह ७ प्रशिक्षित प्राध्यापक, एक अंशकालीन चित्रकला शिक्षक, एक अंशकालीन संगीत शिक्षक, एक पद्‌वीधर कनिष्ठ लिपिक, एक लमसम लिपिक, २ शिपाई असे एकूण १३ सेवक कार्यरत आहेत.

**वर्ग व विद्यार्थी संख्या :-**

या शाखेत ३ तुकडया आहेत. सध्या प्रथम वर्ष ३५, द्वितीय वर्ष ३९ व सेवांतर्गत प्रशिक्षणार्थी ४४ नवीन पद्धतीने प्रशिक्षण घेत आहेत. प्राथमिक शिक्षक निवडश्रेणी प्रशिक्षणाचे प्रशिक्षणार्थी व नवनियुक्त प्रशिक्षित प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण घेतात.

**विद्यालयातील सुविधा :-**

शहाजीराजे शैक्षणिक संकुलात प्रशस्त इमारत, अद्ययावत प्रयोगशाळा, प्रशस्त सभागृह, खेळाचे मैदान, भरपूर खेळसाहित्य, टेपरेकॉर्डर, रेडिओ,डी.व्ही.डी. प्लेअर, दूरदर्शन, ओव्हरहेड प्रोजेक्टर, LCD, संगणक, डिजीटल कॅमेरा, विविध शैक्षणिक साधने, समृद्ध ग्रंथालय, प्रशस्त वसतिगृह, अधीक्षक निवास, प्राचार्य निवास, शिक्षक निवास, कार्यानुभव साहित्य, सुपीक शेती आहे.

**अभ्यासक्रम :-**

इ.स. १९६८ पासून २ वर्षांच्या डी.एड्. सुरु आहे. सन १९८२ पासून शिक्षणशास्त्र पदविका अभ्यासक्रम सुरु आहे. सन १९९४-९५ पासून शिक्षणशास्त्र अध्यापन पदविका अभ्यासक्रम सुरु होता. २००६ पासून डी.टी.एड्. नवीन अभ्यासक्रम सुरु आहे. तसेच पत्रद्वारा अध्यापन वर्ग, नवनवीन अद्यायावत शासनमान्य सेवांतर्गत प्रशिक्षणाचे वर्ग चालविले जातात. शेती प्रात्यक्षिक हा विषय आहे व कागदकाम, पुठ्ठाकाम हा दुय्यम विषय आहे.

**निकालाची परंपरा :-**

या अध्यापक विद्यालयाची निकालाची परंपरा उज्वल आहे. चालू वर्षांचा प्रथम वर्षांचा निकाल ९७.५० % असून शबाना अब्बास मुजावर ही छात्राध्यापिका प्रथम आली असून तिला ८१.९०% गुण मिळाले आहे. तर द्वितीय वर्षांचा निकाल ८१.६० % असून जंगम सुप्रिया संजय हा विद्यार्थी प्रथम आला असून त्याला ८३.६०% गुण मिळाले आहेत.

**शेती विभाग :-**

एकूण ६२ एकर शेती असून त्यापैकी ९ एकर शेती नांगरण्यात आली आहे. संस्थेच्या शेतीची सर्व कामे अंग मेहनतीने विद्यार्थी व सेवकवर्ग करतात. प्रा.श्री. साळुंखे टी.एस. हे विद्यालयाचा शेती विभाग पाहतात.

**सेवांतर्गत प्रशिक्षण :-**

सर्व शिक्षण मोहिमेअंतर्गत प्राथ.शिक्षकांची शिबिरे, प्रशिक्षण वर्ग, तज्ञ मार्गदर्शक, नवनियुक्त प्रशिक्षित व अप्रशिक्षित प्रशिक्षणार्थी वर्गांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. विद्यामंदिर तिळवणी व विद्यामंदिर माले येथे दि. १९/०३/२०१३ ते ०२/०४/२०१३ या कालावधीत छात्र सेवाकाल शिबिर घेण्यात आले. समाज सेवा शिबिर विद्यालयाच्या परिसरात दि. ३०/०१/२०१३ ते ०९/०२/२०१३ या कालावधीत घेण्यात आला.

**सांस्कृतिक विभाग :-**

सुसंस्कार व ज्ञानसंपन्न करणे या उद्दिष्टानुसार सांस्कृतिक विभागाचे कार्यक्रम व कामकाज संपूर्ण वर्षभर नियोजनानुसार चालू असते. शिक्षक दिन, कर्मवीर जयंती, म. गांधी जयंती, म. फुले पुण्यतिथी, इस्माईल मुल्ला पुण्यतिथी, संत गाडगेबाबा पुण्यतिथी, महर्षी विठ्ठल राजजी शिंदे पुण्यतिथी, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती, स्वामी विवेकानंद जयंती, शिवजयंती, सौ. लक्ष्मीबाई पाटील पुण्यतिथी, डॉ. आंबेडकर जयती, छ. शाहू महाराज जयंती, अंधश्रद्धा निर्मूलन व्याख्यान, एड्स निर्मुलन दिन व्याख्यान, राष्ट्रीय विज्ञान दिन, लोकसंख्या दिन व्याख्यान, जागतिक महिला दिन व्याख्यान, रामचंद्र मनोहर नलवडे पुण्यतिथी तसेच राष्ट्रीय सण उत्साहने मान्यवरांच्या हस्ते, विद्यार्थ्यांच्या सहकार्याने संपन्न होतात. विभागप्रमुख म्हणून श्रीमती भोसले के. के. काम पाहतात.

**शैक्षणिक सहल :-**

प्रत्येक वर्षी एक क्षेत्रभेट व एक मोठी सहल काढली जाते. त्याप्रमाणे यावर्षी पेठवडगाव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथे विज्ञान प्रदर्शनास भेट देण्यात आली आहे. मोठी सहल दि.

१६/०८/२०१३ ते १८/०८/२०१३ ला पुणे, अजंठा वेरूळ, औंरगाबाद, पैठण, पंढरपूर इ. ठिकाणी नेण्यात आली होती. विभागप्रमुख म्हणून श्री. वाजे बी.एन. सर पाहतात.

**सामाजिक वनीकरण :-**

या अध्यापक विद्यालयाच्या परिसरात सामाजिक वनीकराण अंतर्गत १० एकरांत सुमारे २५,००० इतकी झाडे लावली व कॉलेजच्या परिसरात व पाठीमाने ७५ शेवग्याची झाडे वाढवून संवर्धन करण्यात आली आहेत. शालेय बाग विकसीत करण्यात आली असून त्यामध्ये औषधी वनस्पती, फुलझाडे इत्यादीनी समृध्द आहे.

**वसतिगृह :-**

**मुलांचे वसतिगृह :-**

या अध्यापक विद्यालयातील गरीब व गरजू विद्यार्थ्यासाठी राजाराम वसतिगृह चालविले जाते. सुमारे १० छात्रशिक्षक सध्या या वसतिगृहात आहेत. सर्व सोयीनीयुक्त स्वतंत्र अशा इमारतीत हे वसतिगृह आहे. चालू वर्षी इमारतीस नव्याने पाईप जोडून पाण्याचे ऍक्वागार्ड शॉवर, बाथरुम इ. करण्यात आले आहे. श्री. पाटील व्ही.एम्. अधीक्षक म्हणून काम पाहतात.

**मुलींचे वसतिगृह :-**

मुलांप्रमाणे गरीब व गरजू मुलीच्यासाठी प्राचार्य निवासमध्ये संडास, बाथरुम, वॉश बेसीन, पाण्याची टाकी इ. सोईसुविधा करून मुलींचे वसतिगृह सुरु करण्यात आले आहे. सध्या सुमारे २८ विद्यार्थीनी या वसतिगृहात आहेत. मुलींच्या पाण्याची व्यवस्था करण्यासाठी नवीन पाण्याची टाकी बांधण्यात आली. मुलींसाठी स्वच्छतागृहाचे नूतनीकरण झाले आहे. श्रीमती भोसले के. के. या अधीक्षक म्हणून काम पाहतात.

**विविध बाहयपरीक्षा :-**

रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर विद्या प्रबोधिनीमार्फत सामान्य ज्ञान परीक्षेस ७९ विद्यार्थी बसले होते. या परीक्षाद्वारे छात्रशिक्षकांची गुणवत्ता वाढविली जाते. यामधून स्पर्धा परीक्षेची तयारी

केली जाते. वक्तृत्व, निबंध, चित्रकला, भावगीत, रांगोळी स्पर्धा इ. स्पर्धानासुद्धा विद्यार्थी सहभाग घेऊन उत्कृष्ट यश संपादन करीत असतात.

**क्रीडा स्पर्धा :-**

शालेय वार्षिक क्रीडा स्पर्धा मार्च, २०१३ मध्ये घेण्यात आल्या. या स्पर्धेमध्ये वैयक्तीक, सांघिक स्पर्धांचा सहभाग होता. या स्पर्धेत या विद्यालयातील स्पर्धांचा सहभाग होता. या स्पर्धेत या विद्यालयातील स्पर्धांचा सहभाग होता. या स्पर्धेत या विद्यालयातील अनेक छात्राध्यापकांनी सहभाग घेतला होता.सविस्तर नियोजन व कार्यवाही क्रीडा फाईलमध्ये आहे.

दरवर्षी अनेक विद्यार्थी यश संपादन करून कॉलेजच्या परंपरेत भर घालीत असतात. विभागप्रमुख म्हणून डॉ.श्री. चट्टे आर. डब्ल्यु. हे काम पाहतात.

**ग्रंथालय :-**

या अध्यापक विद्यालयाचे ग्रंथालय सुसज्ज आहे. अभ्यासक्रमाची पुस्तके, पाठयपुस्तके, संदर्भग्रंथ, साप्ताहिक, मासिके पुरेसे आहेत. विद्यार्थी ग्रंथालयाचे व शिक्षक ग्रंथालयाचे काम प्रा.श्रीम्. भोसले के. के. हे काम पाहतात. पाठाचे साहित्य प्रा. आवळकर एस. के. व स्टेशनरी विभाग प्रा. पाटील व्ही.एम्. हे काम पाहतात. विद्यालयास मासिके, दैनिक पेपर पुरेसे आहेत.

**विविध समित्या :-**

अध्यापक विद्यालयाच्या कामकाजामध्ये शाळासमिती, शेती समिती, वर्ग समिती, विद्या समिती, खरेदी समिती, बांधकाम समिती यांचा सुद्धा फार महत्त्वाचा सहभाग असतो. वर्षारंभापासून प्राचार्याच्या मार्गदर्शनाने समित्यांचे भरीव स्वरुपात योग्य दिशेने कामकाज चालू आहे.

**विविध मंडळे :-**

विद्यालयाचे साहित्यिक गुणवत्ता जोपासणारे वाङ्.मय मंडळ, बौद्धिक क्षमता विकसित करणारे गणित मंडळ, वैज्ञानिक दृष्टिकोन व त्याची उपयोगिता पटविणारे विज्ञानमंडळ, शारीरिक क्षमता वाढवून, टिकवून आदर्श स्वावलंबी नागरिक घडविणारे क्रीडामंडळ, फुरसदीच्या वेळेचा

सदुपयोग करणारे छंदमंडळ अशी विविध मंडळे विद्यार्थ्यांचे सुप्तगुण, कलागुण जोपासण्यासाठी वृद्धिंगत करण्यासाठी कार्यरत आहेत.

**प्रयोगशाळा :-**

अध्यापक विद्यालयास सुसज्ज प्रयोगशाळा उपलब्ध आहे. भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, आरोग्यशास्त्र, शरीरशास्त्र आदींची विभागवार मांडणी केलेली आहे. विभागप्रमुख प्रा.श्री.वाजे बी. एन. यांच्या मार्गदर्शनाखाली सतत कार्यरत असतात.

**अंतर्गत मूल्यमापन :-**

विद्यालयाच्या प्रथम वर्षाच्या, द्वितीय वर्षांच्या व पत्रद्वारा डी.एड्.वर्गांच्या सर्व विषयांचे घटकसंच चाचणी, सहामाही परीक्षा, सराव परीक्षा यांचे नियोजन करुन घेतल्या जातात. तसेच सेवांतर्गत वर्गाची चाचणी घेतली जाते. विभागप्रमुख म्हणून प्रा. आवळकर एस.के. हे काम पाहतात.

**समारोप :-**

हे अध्यापक विद्यालय अधिक प्रगतिपथावर जाण्यासाठी होतकरू, तडफदार, प्राचार्य श्री. कांबळे बी. एम्. यांच्या सखोल मार्गदर्शनाखाली सर्वजण प्रयत्नशील आहेत. एकंदरीत सदर डी. टी. एड्. कॉलेज यशस्वी वाटचाल करीत आहे.

यावर्षी शालेय भौतिक सुविधामध्ये संस्थेच्या परवानगीने व सेवकांच्या सहकार्याने खालीलप्रमाणे पूर्तता करण्यात आली आहे.

१. मुलींच्या वसतिगृहासाठी पाण्याची टाकी अदांजे रु. ३० हजार.

२. मुला-मुलींचे क्रीडागंण तयार केले.

३. मुला-मुलींच्या स्वच्छतागृहाचे नुतनीकरणाचे अंदाजे

रु.२ लाख रुपायाचे काम चालू आहे.

